REGISTERED No. B 3434

**जाहीरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ | पुणें, बुधवार, तारीख ८ जानेवारी, १९४१ | अंक २

सर्व तऱ्हेचीं कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**'पायोनियर डाइंग हाऊस'**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**
**सर्वत्र मिळतें.**

—ः केंद्रें ः—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

**"चिमणा नांव खोड——"**
यांतील मर्म जाणण्यासाठीं
यांतील रहस्य समजावून घेण्यासाठीं

# लग्न पहावं करून

★

नवयुग चित्र

हा नवयुगचा संपूर्ण मराठी विनोदी बोलपट पहा.

★

**३ रा** तुफान हास्याचा **आठवडा**

★

दिग्दर्शक : **विनायक**
भूमिका : **दामुअण्णा मालवणकर**

★

**मिनर्व्हा — पुणें**

मुंबई, नासिक, कोल्हापूर, सोलापूर येथें सुरू आहे.

## विविध माहिती

### कागदाच्या आयातीचें नियंत्रण

युद्धापूर्वी कागद नॉर्वे, स्वीडन, जर्मनी व ऑस्ट्रिया ह्या देशांतून हिंदुस्थानांत येत होता. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर ही आयात बंद पडली व अमेरिकेंतून कागद येऊं लागला. अमेरिकेंतील आपली क्रयशक्ति कायम राखण्याचे हेतूनें हिंदुस्थान सरकारनें तिकडून होणारी कागदाची व कार्डबोर्डची आयात नियंत्रित केली आहे. अमेरिकेंतील दरसाल एक कोटि रुपयांच्या हिंदी खरेदीचें त्यामुळें नियंत्रण होईल. छपाईचा कागद पूर्ववत येऊं शकेल.

### हिंदी युद्ध कर्ज रोख्यांची विक्री
(२८-१२-४० अखेर)

| | रु. |
|---|---|
| बिनव्याजाचे डिफेन्स बाँडस | २,२५,८३,००० |
| पो. ऑ. सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें | १,७२,५८,००० |

### पुस्तकांची ग्रेट ब्रिटनमधून निर्गत

१९४० सालच्या पहिल्या नऊ महिन्यांत ग्रेट ब्रिटनमधून एकूण सुमारें ४ कोटि रुपये किंमतीच्या पुस्तकांची निर्गत झाली. ऑस्ट्रेलियानें सर्वांत अधिक पुस्तकें घेतलीं. त्याचे खालोखाल अमेरिकेनें घेतलीं. दक्षिण आफ्रिका, आयरा, कॅनडा, हिंदुस्थान व न्यूझीलंड ह्यांचा नंतर अनुक्रम लागतो. शेक्सपिअरचीं पुस्तकें व बायबल ह्यांचा खप सर्वांत अधिक झाला.

### २ कोटि, ६० लक्ष पोत्यांची ऑर्डर

इंडियन ज्यूट मिल्स असोसिएशनला हिंदुस्थान सरकारची २ कोटि, ६० लक्ष वाळूच्या पोत्यांची ऑर्डर मिळाली आहे, ती फेब्रुवारी-मार्चमध्यें पुरी केली पाहिजे.

### दारूचा खप वाढविण्यासाठीं प्रयत्न

सिलोनमध्यें आपल्या देशांतील दारूचा खप कसा वाढवितां येईल, ह्यासंबंधीं चौकशी करण्याकरितां दक्षिण आफ्रिकेचा असिस्टंट ट्रेड कमिशनर सिलोनमध्यें गेला आहे.

### कर्नाटक सें. को. बँकेचीं कॅश सर्टिफिकिटें

धारवाड येथील कर्नाटक सेंट्रल को. बँकेनें तीन वर्षे मुदतीचीं, तिच्या रौप्य महोत्सवानिमित्त कॅश सर्टिफिकिटें काढलीं आहेत. २३ नोव्हेंबर, १९४१ रोजीं बँकेची ज्युबिली आहे. प्रत्येक १०० रुपयांस तीन वर्षांनीं १०९ रुपये मिळतील. बँकेचें वसूल भांडवल ५½ लक्ष रुपये असून एकूण खेळतें भांडवल ४३ लक्ष रुपये आहे.

### हिंदुस्थानाकडे निर्गत होणाऱ्या तांदुळावर पट्टी

ब्रह्मदेशांतून निर्गत होणाऱ्या तांदुळावर दर मणास २ आणे ३ पै पट्टी घेण्यांत येते. हिंदुस्थानाकडे निर्गत होणाऱ्या तांदुळास ही पट्टी माफ होती. ती माफी ब्रह्मदेशाच्या सरकारनें आतां १ जानेवारी, १९४१ पासून काढून घेतली आहे.

### पेट्रोलच्या खपाचें नियंत्रण

पेट्रोलचा खप नियंत्रित करावा लागलाच तर त्यासंबंधींची तपशीलवार माहिती गोळा केलेली असावी, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें एक परिषद भरविण्याचें योजिलें आहे. २० जानेवारीचे सुमारास तिची दिल्ली येथें बैठक होईल.

### स्वदेशांतच तयार होणारें अन्न खा.

"शक्य तितकें ग्रेट ब्रिटनमध्यें तयार होणारेंच अन्न खा. बटाटे ग्रेट ब्रिटनमध्यें तयार होतात, ते मुबलक खा. बाहेरून येणाऱ्या कणकेची रोटी करण्यांत येते, तेव्हां ती कमी खा," असा उपदेश अन्नपुरवठ्याचे ब्रिटिश मंत्रि, लॉर्ड वूल्टन, हे रेडिओवरील आपल्या भाषणांत नुकतेच म्हणाले.

### लोखंड व पोलाद ह्यांच्या आयातीस बंदी

हिंदुस्थान सरकारनें लोखंड व पोलाद ह्यांच्या आयातीस बंदी केली आहे.

### १९४० मधील सर्वांत प्रभावी मनुष्य

जागतिक घडामोडींवर सर्वांत प्रभावी परिणाम करणाराची निवड "टाइम" हें अमेरिकन साप्ताहिक दरसाल करीत असतें. १९३८ सालीं हिटलरला व १९३९ सालीं स्टॅलिनला हा मान मिळाला होता. यंदा मि. चर्चिल ह्यांस तो मान मिळाला आहे.

### बँकास सुटी

गुरुवार, ता. ९ रोजीं बकरीद निमित्त बँका बंद राहातील.

### हिंदी कोळशास मागणी

भूमध्य समुद्राचे सभोंवतालच्या युद्धपरिस्थितीचा फायदा हिंदी कोळशांचे खाणीस मिळत आहे. मध्य आशिया व पूर्व आशिया येथील देशांत हिंदी कोळशास मोठी मागणी येऊं लागली आहे.

### मोटारींचें उत्पादन बंद

ग्रेट ब्रिटनमध्यें खासगी वापराच्या मोटारगाड्यांचें उत्पादन बंद ठेवण्यांत आलें आहे. निर्गत करता येण्याजोग्या फक्त ४०० मोटारी ग्रेट ब्रिटनमध्यें शिल्लक आहेत. युद्धापूर्वी २० लक्ष मोटारी तेथें वापरांत होत्या; आतां १४ लक्ष मोटारी वापरांत आहेत. वापरलेल्या गाड्या मिळूं शकतात, परंतु त्यांची किंमतहि चढली आहे.

### छोटेखानी नोटा

ग्रेट ब्रिटनमध्यें २ शिलिंग, २½ शिलिंग व ५ शिलिंग किंमतीच्या चलनी नोटा छापून तयार ठेवलेल्या आहेत. नाणीं कमी पडलीं तर ह्या नोटा प्रचलित केल्या जातील. ग्रेट ब्रिटनमध्यें चांदीचा पुरवठा फार मोठा नाहीं व चांदी खरेदी करण्यासाठी अमेरिकन डॉलर्स खर्चण्याची ही वेळ नाहीं. "हिंदुस्थान सरकारनें ग्रेट ब्रिटनमध्यें व मुंबईंत बरीच चांदी विकली असली तर त्या सरकारजवळ अद्याप बरीच चांदी पडून आहे. तिची साम्राज्यांतर्गत देवघेव करणें सोईचें जाईल व त्यामुळें ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय हुंडणावळीसहि ताण पडणार नाहीं" असें एकॉनॉमिस्ट ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें सुचविलें आहे.

### बँकेचा व्यवहार सकाळींच पुरा करा

आतां दिवस लहान होत चालल्यामुळें ग्रेट ब्रिटनमधील बँकांच्या नोकरवर्गास कामावरून परत जाण्यास अतिशय विलंब होतो. विशेषतः बरेच नोकर दूर अंतरावर रहात असल्यानें सध्याच्या परिस्थितींत बँकांचे कामाचे तास बदलण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. लोकांनीं बँकिंगचे व्यवहार बँका उघडतांच पुरे करावे व उशीरा आलेल्या इतर बँकांवरील चेक्सची वसुली बँकांनीं दुसऱ्या दिवशीं करावी, अशी सूचना लंडन क्लिअरिंग बँकर्सच्या कमिटीनें केली आहे. नाहीं तर, बँकांच सायंकाळीं लवकर बंद करणें भाग पडेल.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १४ | ५ महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीचीं स्थित्यंतरें ... | १८ |
| २ हिंदी रुपयाचें सत्यस्वरूप | १५ | ६ गेल्या वर्षीचें आर्थिक समालोचन ... | २० |
| ३ हिंदी शेती ... | १६ | ७ बाजारभावांतील चढउतार | २० |
| ४ स्फुट-विचार ... केसरी-मराठा हीरक महोत्सव-युद्ध परिस्थितीचें स्वदेशी धंदयास उत्तेजन बँबे को. कार्टेल्रीं— दिवंगत बाबासाहेब विद्वांस | १७ | ८ शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा ... | २१ |
| | | ९ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | २२ |
| | | १० निवडक बाजारभाव ... | २२ |



# अर्थ

बुधवार, ता. ८ जानेवारी, १९४१


## हिंदी रुपयाचें सत्यस्वरूप

### शंकानिरसन

"अर्था" च्या २५।१२।४० च्या अंकांतील 'नवे रुपये' हें सदर वाचून एका जिज्ञासू वाचकास कांहीं शंका आल्या त्यांविषयीं स्पष्टीकरण व्हावें अशी सूचना करण्यांत आल्यावरून खालील खुलासा आम्ही करीत आहों. त्याचा दुसऱ्या अनेक वाचकांस उपयोग होईल असें वाटतें. "रुपया हें प्रमाणभूत नाणें नाहीं" ह्या विधानावर 'मग प्रमाणभूत नाणें कोणतें' अशी मुख्य शंका; इतर प्रश्न आनुषंगिक आहेत. तिचें निरसन असें:—हिंदुस्थानांत सन १८९३ सालापर्यंत रुपयाचें नाणें "प्रमाणभूत" होतें, म्हणजे त्यांतल्या चांदीच्या वजनाइतकी चांदी टाकसाळींत नेऊन दिली असतां अल्पखर्चानें तिचीं रुपयाचीं नाणीं पाडून घेण्याचा हक्क नागरिकांस असे. विशिष्ट वजनाचें आणि कसाचें सोनें अगर चांदी हें प्रत्येक देशांत सर्व मोल मापण्याचें साधन मानण्यांत येतें. कागदाच्या नोटा चलन म्हणून सरकारनें किंवा मध्यवर्ती बँकेनें काढल्या तरी हीं प्रमाणभूत नाणीं त्यांच्या मोबदल्यांत कोणासहि हक्कानें मिळू शकतात. गेल्या कांहीं वर्षांच्या परिस्थितींत हा हक्क सरकारनें काढून घेतला आहे. परदेशाचें देणें द्यावयाचें असतां व्यापारी हुंड्या बाजारांत मिळाल्या नाहींत किंवा मध्यवर्ती बँकेस त्या पुरवतां आल्या नाहींत तर त्यांसाठी योग्य किंमतीची परिमाणभूत धातू देण्याची जबाबदारी सरकारावर असते. तथापि नित्याच्या व्यवहारांत कागदाचें किंवा तांब्याचें चलन असणें आवश्यक वाटतें आणि त्यानें देवघेवीचाहि कार्यभाग होतो. ह्या कारणानें प्रमाणभूत असलेल्या नाण्यांचा बेताचा संग्रह सरकार किंवा मध्यवर्ती बँक ह्यांनीं संग्रहीं ठेवला असतां काम भागतें. ह्या नाण्यांच्याऐवजी कागदाचें किंवा हलक्या धातूंचें नाणें लोकांनीं वापरलें असतां खर्चांत बचतहि होते. व्यवहाराची सोय आणि सोन्या-चांदीची बचत असा दुहेरी फायदा ह्या व्यवस्थेपासून होतो.

जगांतील सर्व प्रमुख देशांत ही पद्धति मान्यता पावली आहे. हिंदुस्थानांत मात्र १८९३ सालापर्यंत सोन्याच्या नाण्याचे ऐवजीं चांदीचा रुपया प्रमाणभूत मानला जात असे. चांदीचा रुपया बनवून मिळणें आणि रुपयाच्या नाण्याची चांदी वितळवून करणें ह्या गोष्टी कायदेशीर व सोयीच्या असत. परंतु त्या सुमारास कित्येक वर्षें चांदीची किंमत सारखी उतरत चालली होती, ह्यामुळें कमी किंमतीची पण ठराविक वजनाची स्वस्त चांदी टाकसाळींत देऊन तिचे रुपये पाडून घेणें लोकांस शक्य होऊं लागलें. ह्यामुळें विलायती हुंडीचा दर उतरत राहिला आणि लंडनमधलें आपलें वार्षिक देणें देण्यास हिंदी सरकारास अधिक रुपये द्यावे लागून त्याचा खर्च भलताच वाढला. त्यावर उपाय म्हणून लोकांचा चांदीच्या मोबदल्यांत रुपये पाडण्याचा हक्क सरकारनें काढून घेतला आणि व्यवहारांत खेळणाऱ्या रुपयांचें प्रमाण हळूहळू मर्यादित केलें. रुपयांतल्या चांदीची बाजारी किंमत आणि त्या नाण्याची व्यवहारांतली किंमत ह्या दोहोंत जी एकवाक्यता होती ती आतां नाहींशी झाली. रुपया हें नाणें प्रतीक स्वरूपाचें होऊन त्याची अंगभूत धातुगत किंमत उतरली तरी त्याची दर्शनी किंमत तेवढी अबाधित राहिली. ह्याचाच अर्थ असा कीं रुपयाच्या नाण्यास कागदाच्या नोटेचें स्वरूप प्राप्त झालें. पण असलें प्रतीकस्वरूप नाणें, कागदी नोटा किंवा हलक्या धातूंचीं व अल्प किंमतीचीं नाणीं ह्यांचा संबंध कोणत्या तरी प्रमाणभूत नाण्याशीं हवाच. इंग्लंडच्या धर्तीवर सोन्याचें नाणें चालू करून तें प्रमाण कायद्यानें निश्चित करावें असा विचार सरकारनें केला. त्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति झाली असती तर हिन्दी चलन पद्धति ब्रिटिश नमुन्याची झाली असती. तिकडचा सॉव्हरिन येथें परिमाण बनला असतां आणि त्याच्या प्रमाणांत सर्व प्रकारच्या चलनांच्या किंमती ठरल्या असत्या, सोनें हा धातु परिमाण बनला असता आणि रुपयाच्या नाण्यास ब्रिटिश शिलिंगाचें स्वरूप प्राप्त झालें असतें. पण सोनें हा धातू आणि त्याचें नाणें हें किंमतीचें मान करण्याचा सरकारचा विचार तसाच हवेमध्यें राहिला आणि रुपया मात्र चांदीच्या तुकड्यावर छापलेल्या नोटेसारखा प्रतीकस्वरूप चलन म्हणून राहिला. किती रुपये पाडावे व प्रचलित करावे ही गोष्ट सर्वस्वीं सरकारच्या हातीं असल्यानें, त्यांतल्या चांदीची किंमत कितीहि कमी-अधिक होवो, त्या नाण्याची दर्शनी किंमत निश्चित करणें सोपें झालें. परदेशांशीं होणाऱ्या व्यवहारांसाठी रुपयांच्या मोबदल्यांत लंडनवरच्या हुंड्या देण्याची व्यवस्था सरकारनें केली कीं कार्यभाग होत असल्यानें सोन्याचें नाणें किंवा त्याबद्दल धातूचा संग्रह ह्यांस महत्त्व राहिलें नाहीं. ब्रिटिश चलनांत रुपयाची किंमत अठरा पेन्स असें प्रमाण ठरवून टाकण्यांत आलें आणि त्यास अनुसरून जरूरीप्रमाणें रुपयांची अदलाबदल होण्याची व्यवस्था करण्यांत आली. ठराविक दराची ब्रिटिश पौंडांतली हुंडी हेंच रुपयाचें अंतिम प्रमाण बनलें.

हिंदी चलनाचा संबंध ब्रिटिश पौंडाशी जोडून त्यास ह्याप्रमाणें पौंडावर अवलंबावयास लावणें योग्य नाहीं आणि म्हणून रुपयाचें परिमाण विशिष्ट वजनाचें सोनें कायद्यानें ठरवावें अशी शिफारस हिल्टनयंग कमिशननें सरकारास केली. सोन्याच्या नाण्याची व्यवहारांत आवश्यकता नसल्यानें देशाच्या बाहेर पाठवण्यास पाहिजे असेल तेवढ्या किंमतीच्या सोन्याच्या चिपा ठराविक दरानें सरकारनें खरेदीदारास पुरवाव्या अशी कमिशनची सूचना होती. रुपया व सोनें ह्यांचा मोबदला होऊं शकतो ही गोष्ट हिंदी जनतेच्या लक्षांत ठळकपणानें यावी अशी तजवीजहि सरकारनें करावी असें त्याचें म्हणणें होतें. रुपयाचा संबंध सोन्याशी जोड-

ण्याचें महत्त्व किती आहे ह्याची स्पष्ट कल्पना कमिशनला होती. सोन्याच्या संचयाच्या मर्यादितपणामुळें सोन्याचें नाणें पाश्चात्य देशांतहि कित्येक वर्षे बंद झालें आहे. परराष्ट्रीय देण्या-घेण्यांतच काय तो त्याचा उपयोग करण्याची प्रथा अलीकडे पडली आहे. हिंदी रुपयास आज परिमाण ब्रिटिश पौंडाचेंच आहे आणि त्याच्या किंमतीचा सोन्याच्या किंमतीशी असलेला संबंध जसजसा बदलतो तसतशी रुपयाची परदेशीय किंमत बदलते. सर्व जगांत सोन्यास मान्यता आहे ह्या दृष्टीनें रुपयाचा संबंध प्रत्यक्षपणानें त्या धातूशीं जोडला जावा ही हिंदी लोकमताची कित्येक वर्षांची मागणी आहे. युद्ध-परिस्थितीनें जगांत सर्वत्र चलन-व्यवस्था कृत्रिम करून सोडली आहे आणि सर्व चलनांचा सोन्याशीं नाममात्रच संबंध राहिला आहे. हिंदी रुपया कृत्रिम व प्रतीकप्राय आहे. त्यांत चांदी किती आहे हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. देशांत सोन्याचा संचय मोठा असावा आणि त्याचा भरपूर आधार हिंदी चलनास मिळावा आणि तसेंच हुंडणावळीचा दर व्यापार व उद्योगधंद्यांतल्या देण्यास अनुकूल असा असावा ह्या मुख्याच्या गोष्टी आहेत. चलनास सोन्याचा भक्कम आधार असला म्हणजे रुपयांत चांदी किती आहे हा प्रश्न दुय्यम महत्त्वाचा ठरतो. नोटांचा कागद केवढ्या किंमतीचा आहे ह्या प्रश्नाप्रमाणेंच तो निरर्थक आहे. सुवर्णसंचय, रुपयाचा सोन्याशीं प्रत्यक्ष संबंध व हुंडणावळीचा योग्य दर ह्यांवरच हिंदी लोकमतानें विशेष जोर दिला आहे, तो ह्यामुळेंच होय. धातूचें व कागदी चलन हें देवघेवीचें साधन आहे आणि ह्या दृष्टीनेंच त्याकडे मुख्यत्वेंकरून पाहिलें पाहिजे. त्यास भरपूर सोन्याचा आधार असावा आणि त्याच्या संचयाचा विनियोग देशाच्या आर्थिक प्रगतीस पोषक होईल अशा रीतीनें केला जावा ह्याच गोष्टी पहिल्या प्रतीच्या महत्वाच्या आहेत.

## हिंदी शेती

(२)

### गळिताचीं धान्यें : भुइमूग

हिंदी व्यापारी पिकांत गळिताच्या धान्यांस अतिशय महत्त्व आहे. त्या सर्वांत महत्त्वाचें पीक भुइमुगाचें होय. भुइमुगाखालीं सुमारें ८० लक्ष एकर जमीन असून त्यांतून सुमारें ३० लक्ष टन भुइमूग निघतो. भुइमुगाची लागवड हिंदुस्थानांत केव्हां व कशी सुरू झाली हें सांगतां आलें नाहीं, तरी १९२४ नंतर त्याची लागवड झपाट्यानें वाढत गेली, एवढें खरें.

भुइमुगाची लागवड व उत्पादन

| वर्ष | लागवड ( एकर ) हजार | उत्पादन ( टन ) हजार |
|---|---|---|
| १९२९–३० | ५,१७७ | २,१८० |
| १९३०–३१ | ६,०१४ | २,५९२ |
| १९३१–३२ | ५,०८१ | २,१५१ |
| १९३२–३३ | ६,८८७ | २,८४६ |
| १९३३–३४ | ७,५८६ | ३,१८६ |
| १९३४–३५ | ५,१४१ | १,७४० |
| १९३५–३६ | ५,१९७ | २,११४ |
| १९३६–३७ | ६,६६३ | २,७१४ |
| १९३७–३८ | ८,८९८ | ३,५०१ |
| १९३८–३९ | ८,५०६ | ३,२१९ |
| १९३९–४० | ८,११२ | ३,००२ |

चालू युद्धामुळें भुइमुगाचें परराष्ट्रांतील गिऱ्हाइक गेलें आहे व त्या कारणानें बाजारभाव फार खालीं गेले आहेत.

### आळशी

आळशीची लागवड मुख्यतः मध्यप्रांत, संयुक्तप्रांत व बिहार येथें होते. हिंदी शेती पावसावर अवलंबून असल्याकारणानें पाऊस वेळेवर न पडल्यास सर्वच पीक जाऊं नये, ह्यासाठी शेतकरी शेतांत एकापेक्षा अधिक वेगवेगळीं पिकें लावतात. म्हणजे, निदान एकादें तरी पीक निश्चित हातीं येतें. आळशीचें पीक ह्या प्रकारचें आहे, त्याकारणानें त्याच्या लागवडीचा निश्चित अंदाज करणें कठीण जाते.

लागवड, उत्पादन व निर्गत

| वर्ष | लागवड हजार (एकर) | उत्पादन हजार ( टन ) | निर्गत हजार (टन ) |
|---|---|---|---|
| १९२९–३० | २,८०२ | ३८० | २४८ |
| १९३०–३१ | २,००९ | ३७७ | २५७ |
| १९३१–३२ | ३,३०९ | ४१६ | १२० |
| १९३२–३३ | ३,२९९ | ४०७ | ७२ |
| १९३३–३४ | ३,२६१ | ३७६ | ३८३ |
| १९३४–३५ | ३,४१० | ४२० | २४० |
| १९३५–३६ | ३,४५७ | ३८८ | १६५ |
| १९३६–३७ | ३,६७७ | ४२० | २९४ |
| १९३७–३८ | ३,८९० | ४६१ | २२६ |
| १९३८–३९ | ३,८६९ | ४४२ | ३१८ |
| १९३९–४० | ३,७१३ | ४६७ | ... |

### एरंडी

तुरी व तत्सम पिकांखालीं ६० लक्ष एकर जमीन आहे. एरंडीची लागवड कोठेंहि होऊं शकते व त्यास कोणतीहि हवा चालते. निजाम हद्दींत त्याचें पीक मोठें आहे व तेथें इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चतर्फे त्या पिकाचे बाबत संशोधनकार्य चालू आहे. खालील तक्त्यांत ह्या पिकाचा तपशील दिला आहे.

| वर्ष | लागवड ( हजार एकर ) | उत्पादन ( हजार टन ) |
|---|---|---|
| १९२९-३० | १,२८५ | ११६ |
| १९३०-३१ | १,४५७ | १२० |
| १९३१-३२ | १,५८३ | १४६ |
| १९३२-३३ | १,६१७ | १५१ |
| १९३३-३४ | १,५३४ | १४३ |
| १९३४-३५ | १,४४८ | १०५ |
| १९३५-३६ | १,४३८ | १२१ |
| १९३६-३७ | १,४०९ | १२८ |
| १९३७-३८ | १,१४८ | १०४ |
| १९३८-३९ | १,१९९ | १११ |
| १९३९-४० | १,००९ | ९४ |

एरंडीची निर्गत पूर्वी आतिशय मोठ्या प्रमाणावर होत असे, ही आतां फार रोडावली आहे.

निर्गतींत घट

| वर्ष | निर्गत ( टन ) |
|---|---|
| १९३३–३४ | ८१,५५९ |
| १९३४–३५ | ६८,६४९ |
| १९३५–३६ | ५९,९६८ |
| १९३६–३७ | ४३,०८९ |
| १९३७–३८ | ४२,०७९ |
| १९३८–३९ | ७,६२१ |

एरंडीची पेंड हें एक उत्कृष्ट खत आहे व ह्या पिकाच्या किंमतींत सध्या विशेष घट झालेली नाहीं.

# स्फुट विचार

## केसरी-मराठा हीरक महोत्सव

केसरी आणि मराठा ह्या वृत्तपत्रांचा हीरक महोत्सव गेल्या आठवड्यांत साजरा झाला. ह्या प्रसंगीं त्यांचेवर चोहोंकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला त्यावरून त्यांची लोकप्रियता आणि त्यांनीं केलेल्या व चालविलेल्या सार्वजनिक हिताच्या कामगिरी-विषयींची जनतेची हार्दिक गुणग्राहकता सिद्ध होते. केसरी आणि मराठा ह्या पत्रांच्या साठ वर्षांच्या चरित्रांत महाराष्ट्राचाच नव्हे तर सबंध हिंदुस्थान देशाचा राजकीय व सामाजिक इतिहास सारांश रूपानें साठवलेला आहे. वृत्तपत्राच्या धंद्याचे दृष्टीनेंहि केसरीनें उच्च स्थान मिळवलें आहे. त्याच्या यशाची गुरुकिल्ली त्याच्यामागे असलेल्या लोकमान्य टिळकांच्या विशिष्ट व्यक्तित्वांत आणि त्यांच्या परंपरेंत आहे. जाज्वल्य देशाभिमान, हिंदी राष्ट्राच्या उन्नतीविषयींचें उच्च ध्येयवादित्व, राष्ट्रीय ध्येयाच्या सिद्ध्यर्थ कर्तव्य वाटणारा स्वार्थत्याग करण्याची तयारी, लिखाणाच्या मागें असलेली विद्वत्ता आणि त्याचें परिणामकारित्व इत्यादि गुणांच्या समुच्चयामुळें लोकमान्यांच्या हातांत केसरीपत्र विलक्षण रीतीनें प्रभावी व यशस्वी झालें आणि त्यास राष्ट्रीय सार्वजनिक संस्थेचें स्वरूप प्राप्त झालें. त्यांच्यामागें केसरीच्या चालकांनीं आपल्यावर पडलेली जबाबदारी ओळखून त्यांच्या यशाची जिंदगी सुरक्षित राखून तीमध्यें भर घालण्याचा प्रयत्न केला आहे हें त्यांस भूषणावह आहे. केसरी व मराठा पत्रांच्या चालकांचें व संपादकवर्गाचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतों आणि त्यांच्या हातून उत्तरोत्तर अधिक विस्तृत कामगिरी होऊन तिचा महाराष्ट्रास व सबंद राष्ट्रास वाढता उपयोग होवो असें आम्हीं इच्छितो.

---

## युद्ध परिस्थितीचें स्वदेशी धंद्यांस उत्तेजन

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचा १९३९-४० सालाबाबतचा वृत्तांत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत दिलेल्या माहितीमुळें ह्या देशाच्या औद्योगिक परिस्थितीवर युद्धाचे परिणाम होत आहेत, त्यांवर उद्बोधक प्रकाश पडला आहे. कित्येक प्रकारच्या युद्ध सामुग्रीचा पुरवठा करण्याचें कार्य हिंदी कारखान्यांवर येऊन पडलें आणि त्यांतल्या उत्पादनाचा विस्तार झाला हें स्वाभाविक आहे. तागाच्या गिरण्या आणि पोलादाचे कारखाने ह्यांच्या मालास पूर्वीच्या वर्षाचे मानानें अधिक मागणी आली. पोलादाचें उत्पादन ११ टक्क्यांनीं वाढून ८ लक्ष टन झालें. देशी कागदाचें उत्पादन २ लक्ष, ३२ हजार टनांनीं वाढलें आणि त्याचें परिमाण १४ लक्ष १६ हजार टनांपर्यंत गेलें. हिंदी खाणींतून निघालेल्या दगडी कोळशाचें परिमाण अडीच कोटि टनांवर चढलें. गेल्या दहा वर्षांत एवढा कोळसा कोणत्याहि सालीं बाहेर निघाला नव्हता. देशी साखरेचें उत्पादन १३-१४ लक्ष टनांपर्यंत वर गेलें. त्याच्या पूर्वीच्या वर्षी हा आकडा सुमारें साडेसात लाख टन एवढाच होता. युद्धामुळें औद्योगिक उत्पादनाचा हा जो विस्तार झाला, त्यास एक महत्त्वाचा अपवाद म्हटला म्हणजे कापसाच्या कापडाचा होय. ह्या धंद्यानें पाऊल पुढें पडण्याचेऐवजी मागेंच हटलें. १९३८-३९ मध्यें हिंदी कापडाच्या गिरण्यांत उत्पादन मोठ्या प्रमाणांत झालें होतें आणि त्यांचा पुष्कळसा माल पडून राहिला होता. ह्या कारणानें उत्पादनाच्या विस्ताराचा प्रश्नच उद्भवणें शक्य नव्हतें. मध्यम प्रमाणावरील धंद्यांसहि युद्धपरिस्थितीमुळें उत्तेजन मिळालें. लोकरीच्या कारखान्यांत तयार होणारा सर्व माल सरकारनें उचलला. कमावलेल्या कातड्याची निर्गत पूर्वीच्या वर्षांच्या मानानें पुष्कळच वाढली. कित्येक जातींचा माल बाहेरून येणें बंद झालें किंवा त्यांच्या किंमती वाढल्या ह्या कारणानें त्यांच्या उत्पादनास येथें चालना मिळालेली आहे. ह्या रीतीनें युद्ध परिस्थितीचा परिणाम देशी उद्योग-धंद्यांच्या वाढीस सहायभूत झालेला आहे.

---

## बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा डिसेंबर १९४० चा अंक प्रसिद्ध झाला आहे. सोसायट्यांची यूनियन्स मार्फत देखरेख ह्या विषयावर क्वार्टर्लीचे प्रस्तुत अंकांत अत्यंत उद्बोधक लेख आले आहेत. सध्याची पद्धति काटकसरीचीहि नाहीं व असावी तितकी दोष-रहितहि नाहीं. कामाची विभागणीहि नीट झालेली नाहीं. डिस्ट्रिक्ट बोर्ड्स ऑफ सुपरवायझिंग यूनियन्सचें उत्पन्न मर्यादित असल्यामुळें त्यांच्या नोकर वर्गाची स्थिति सुधारणें अशक्य होतें. नोकरीची अशाश्वति हीहि एक महत्त्वाची बाब आहे. मध्यवर्ती बँकांनींच देखरेखीची जबाबदारी पत्करली तर तें सोईचें होईल, असें मत व्यक्त केलें जात आहे. ह्या सर्व प्रश्नांचा विचार त्रैमासिकांतील लेखांत करण्यांत आलेला आहे. मद्रास सहकारी रिपोर्टावरील प्रो. काळे ह्यांच्या लेखाचा दुसरा भाग त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला आहे. सेंट्रल बँकांच्या बोर्डावर वैयक्तिक भागीदारांचे प्रतिनिधि असण्याचें कारण नाहीं, अशी मद्रास कमिटीची सूचना आहे, तिचा परामर्श प्रो. काळे ह्यांनीं आपल्या लेखांत घेतला आहे. बडोद्यांतील शेतीच्या बँकांची माहिती "एक सहकारी" लेखकानें दिली आहे. श्री. शामण्णा ह्यांनीं आपल्या लेखांत सहकारी चळवळींतील सेंट्रल बँकांच्या महत्त्वाचें वर्णन केलें आहे. अंकांत नेहमींचीं उपयुक्त सदरें आहेतच.

---

## दिवंगत बाबासाहेब विद्वांस

केसरी-मराठा पत्राचे व्यवस्थापक श्री. बाबासाहेब विद्वांस ह्यांच्या मृत्यूमुळें महाराष्ट्रीय वृत्तपत्रांच्या धंद्याची मोठी हानि झाली आहे. वृत्तपत्रीय धंद्याचा त्यांचा अनेक वर्षांचा अनुभव, त्यांची निरलस उद्योगी वृत्ती आणि त्यांची स्वकर्तव्यावरील दृढ निष्ठा ह्यांचे योगानें बाबासाहेबांची केसरी-मराठा पत्रांच्या छापखान्यावर व कचेरीवर विलक्षण छाप असे. ह्या पत्रांवर अनेक संकटें आलीं असतां त्यांमधून त्यांस पार पाडण्यांत बाबासाहेबांनीं शिकस्त करून त्यांच्या प्रगतीस हातभार लावला. लोकमान्य टिळक आणि त्यांचें कुटुंब ह्यांस त्यांनीं सर्व तऱ्हेनें आधार दिला. त्यांची वृत्ति अखेरपर्यंत उल्हसित व निश्चयी असे आणि स्वतःच्या कामाच्या मर्यादेचे बाहेर ते सहसा जात नसत, ह्यामुळें सार्वजनिक जीवनांत लोकांस त्यांचा विशेष परिचय झाला नाहीं. तथापि केसरी-मराठा संस्थेस त्यांचें मोठें सहाय झालें आहे. त्यांच्या आत्म्यास ईश्वर शांति देवो.

## महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीचीं स्थित्यंतरें

स्वदेशी चळवळीचे द्रष्टे, प्रणेते व कार्यकर्ते महाराष्ट्रांतच सर्वांच्या आधीं निघाले असून त्यांच्या योगानें महाराष्ट्रांत व्यवसायात्मक वातावरण उत्पन्न झालें. आर्थिक व्यवहार व औद्योगिक संस्था यांवर पांढरपेशा महाराष्ट्रीयांची सत्ता नसल्यामुळें बेकारीस आळा घालणें कठीण झालें. अलीकडे ही स्थिति बरीच पालटली आहे. तथापि मुंबई शहरांतील व्यापारांत व उद्योगधंद्यांत महाराष्ट्रीयांनीं अधिक प्रमाणांत शिरल्याशिवाय महाराष्ट्राचा उद्धार होणार नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रें आणि जपान यांच्या मानानें हिंदुस्थान देश उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या बाबतींत मागासलेला आहे आणि ह्यासंबंधांत प्रगति घडवून आणण्याचे प्रयत्न, चर्चा, प्रचार व व्यवहार या मार्गांनीं आज दोन पिढ्यांचे वर हिंदी पुढाऱ्यांनीं चालवले आहेत. असमाधानकारक आर्थिक परिस्थिति, शेतीच्या धंद्याची दुःस्थिति, सामान्य जनतेची हलक्या दर्जाची रहाणी, सुशिक्षित वर्गांत वाढती बेकारी, कारखाने व व्यापारव्यवसाय ह्यांची मंद गति इत्यादि औद्योगिक मागसलेपणाचीं लक्षणें हिंदुस्थानच्या सर्वच विभागांत कमी अधिक प्रमाणांत दिसून येत आहेत; तथापि इतर प्रांतांचे बरोबरीनें महाराष्ट्राचें पाऊल पुढें पडत गेलेलें नाहीं अशी जी सामान्य समजूत आहे तींत पुष्कळ तथ्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आर्थिक उन्नतीच्या बाबतींतली महाराष्ट्रीय समाजाची उणीव हा नेहमीच्या चर्चेचा विषय आहे. उद्योगधंदे आणि व्यापार आधुनिक पद्धतीनें आणि मोठ्या प्रमाणावर अलीकडे हिंदुस्थानांत चालत आहे पण त्या क्षेत्रांत महाराष्ट्रीयांस मानाचें स्थान नाहीं ह्याची विचारी लोकांस खंत वाटत आहे. महाराष्ट्रांत स्वार्थत्याग आहे, तीव्र बुद्धि आहे, उत्तम शिक्षणप्रसार आहे, संस्कृतीचा अभिमान आहे, राष्ट्रीय प्रगतीची प्रबळ इच्छा आहे, पण कारखाने, धंदे, व्यापार, मोठ्या प्रमाणावरील शेती इत्यादि संपत्तीचीं साधनें महाराष्ट्रीयांच्या हातीं नाहींत, ह्या कारणानें त्यांची आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांतहि कुंचंबणा होत असल्याची ओरड वारंवार ऐकूं येते.

सांपत्तिक प्रगतीच्या बाबतींत महाराष्ट्र स्वतः मंदगति असला तरी मंदौत्सुक्य नाहीं आणि हिंदी राष्ट्राचें औद्योगिक धोरण प्रगतिपर करण्याचे कामीं महाराष्ट्रीय नेत्यांनीं पुढाकार घेतला आहे ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. इंग्लंडच्या खुल्या व्यापाराच्या तत्त्वाच्या दडपणाखालीं हिंदुस्थानांत सरकारी आर्थिक धोरण देशी उद्योगधंद्यांच्या प्रगतीस पोषक होऊं शकलें नाहीं. परदेशी मालास ह्या देशांत मुक्तद्वार असल्यामुळें येथील जुने उद्योगधंदे अवनतीच्या घसरगुंडीस लागले आणि आधुनिक पद्धतीच्या कारखान्यांस वाव मिळूं शकला नाहीं. युरोपांत, अमेरिकेंत आणि आशियामध्यें जपानांत खुल्या व्यापाराच्या ब्रिटिश धोरणास राष्ट्रीय सरकारांनीं धाब्यावर बसवलें आणि आपल्या लोकांस आधुनिक पद्धतीचे व्यवसाय चालवण्यास उत्तेजन दिलें. परदेशांतून येणाऱ्या मालावर जकाती बसवून त्याच्या आयातीस प्रतिकूल अशी परिस्थिति निर्माण करणें आणि त्या प्रकारचा माल स्वदेशांत निघण्यास अनुकूल वातावरण उत्पन्न करून त्यासाठीं आवश्यक त्या सवलती देणें, ही औद्योगिक संरक्षणाची सर्वमान्य पद्धति आहे. हिंदुस्थान सरकारच्या हातून ही राष्ट्रीय कामगिरी होण्याची शक्यता न दिसल्याकारणानें ती हिन्दी जनतेच्या पुढाऱ्यांस हातीं घ्यावी लागली. विचार, प्रचार आणि आचार असें त्रिविध प्रकारचें हें कार्य होतें आणि त्यांत महाराष्ट्रीय पुढारी अग्रस्थानीं होते ही महत्त्वाची गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. स्वतः स्वदेशी माल वापरणें, त्याचेविषयीं लोकांचीं मनें वळवणें आणि देशी उद्योगधंदे स्थापण्यास सहाय्य करणें हीं तिन्हीं कामें त्यांनीं आघाडीस जाऊन केलीं हें महाराष्ट्रास भूषणावह आहे.

### स्वदेशीचे पाहिले द्रष्टे

स्वदेशी चळवळीचा इतिहास सांगण्याचें हें स्थळ नाहीं. तिचा पुरस्कार महर्षि दादाभाई नौरोजी, बाबू रमेशचंद्र दत्त इत्यादि अखिल भारतीय पुढाऱ्यांनीं केला. परंतु स्वदेशीचे पहिले द्रष्टे, प्रणेते व कार्यकर्ते महाराष्ट्रांतच निघाले, हें येथें विसरतां कामा नये. सार्वजनिक काकांची ह्या संबंधांतली निष्ठा व कार्य हीं सुप्रसिद्ध आहेत. पन्नास वर्षांमागें न्यायमूर्ति रानडे ह्यांनीं खुल्या व्यापाराचें आणि अनियंत्रित वैयक्तिक स्पर्धेचें अर्थशास्त्रीय तत्त्व हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत लागू पडत नाहीं हें विद्वत्ता-प्रचुर विवेचनाच्या सहाय्यानें सिद्ध करून दाखवलें आणि भारतीय अर्थशास्त्राची स्थापना केली. तसेंच औद्योगिक परिषदा व प्रदर्शनें ह्यांचा व्यवस्थित उपक्रम करून त्यांनीं व्यावहारिक स्वदेशीस उत्तेजन दिलें. श्री. नागपूरकर, श्री. माधवराव नामजोशी, इत्यादींनीं ह्याच क्षेत्रांत कार्य केलें. कित्येक औद्योगिक संस्था व धंदे त्यांच्या नेतृत्वामुळें निघाले आणि महाराष्ट्रांत व्यवसायात्मक वातावरण पसरलें. रे इंडस्ट्रिअल म्यूझियम् हें त्या काळच्या ह्या प्रयत्नांचें दृश्यफल आहे. श्री. अंताजी दामोदर काळे ह्यांनीं पैसाफंडाबाबत अविरत खटपट केली आणि महाराष्ट्रीय जनतेनें त्यांच्या प्रयत्नांस उत्तेजन दिलें तें स्वदेशीच्या प्रेमामुळेंच होय. काचेचा स्वदेशी धंदा ह्या देशांत दृढमूल होण्यास पैसाफंड काचशाळेचा झालेला उपयोग सर्वमान्य आहे. लोकमान्य टिळक, नामदार गोखले व रा. ब. ग. व्यं. जोशी ह्यांच्यासारख्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं स्वदेशीला भक्कम पाठिंबा दिल्यानें सर्व हिंदुस्थानभर त्या चळवळीस प्रोत्साहन मिळालें. 'केसरी'नें स्वदेशीचा पुरस्कार निःसीम निष्ठेनें आणि विलक्षण चिकाटीनें प्रथमपासून केला आहे ही गोष्ट महाराष्ट्र विसरणार नाहीं.

महाराष्ट्रांतील स्वदेशी चळवळीच्या इतिहासाच्या पहिल्या कालखंडांत कित्येक लहान-मोठे धंदे व संस्था स्थापन झाल्या, त्यापैकीं कांहीं आजहि विद्यमान आहेत. तथापि कित्येक वर्षें ही चळवळ कल्पनामूलक, प्रचारात्मक व शैक्षणिक अशीच राहिली. आमच्या पुस्तकी शिक्षणास शास्त्रीय, व्यापारी व हस्तव्यवसायात्मक वळण लावलें जाण्याची भाषा सर्वत्र ऐकूं येत होती आणि प्रिन्सिपॉल गोळे ह्यांच्या "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" ह्या पुस्तकांत व्यक्त झालेल्या विचारांचा प्रतिध्वनि मधून मधून ऐकूं येत होता. तरीहि नवीन उद्योगधंद्यांत भांडवल घालणें, नवीन तऱ्हेचा माल तयार करणें, व्यापारव्यवसायांच्या निरनिराळ्या शाखांत प्रवेश व प्रगति करणें ह्या गोष्टी पांढरपेशा वर्गाच्या हातून घडल्या नाहींत. व्यापार आणि धंदे यांस हा वर्ग पारखा होता. मध्यम स्थितींतील लोकांच्या आवडीनिवडी व गरजा मात्र झपाट्यानें बदलत चालल्या होत्या पण त्यांचें समाधान करण्याचें उत्पादनसामर्थ्य महाराष्ट्रांत त्या मानानें उत्पन्न झालें नाहीं. कापड, साखर इत्यादि स्वदेशी मालच झीज सोसूनहि

वापरावयाचा महाराष्ट्रीयांनीं निश्चय केला; पण तो माल स्वतः तयार करण्याची त्यांची तयारी नव्हती. विमा उतरणें, बँकिंगचा व्यवहार करणें, मालाची घाऊक खरेदी-विक्री करणें ह्या बाबतींत महाराष्ट्रीय परावलंबी होते. सुशिक्षित लोकांचा धंदे व व्यापार ह्यांत हात मुठीच नव्हता असें म्हटलें तरी चालेल आणि त्यांमध्यें बेकारी मात्र वाढत चालली. आर्थिक व्यवहार व औद्योगिक संस्था ह्यांवर ज्यांची सत्ता, त्यांचेच हातीं नोकरी व काम मिळवून देण्याचा अधिकार असणें स्वाभाविक होतें; आणि ही सत्ता पांढरपेशा महाराष्ट्रीयांच्या हातीं नसल्यानें बेकारीस आळा घालणें कठिण झालें. पांढरपेशा वर्ग अजून सरकारी नोकऱ्यांमागे होता. जुन्या पद्धतीनें उद्योगधंदा करणारांचें कसेंबसें चाललें पण ज्यांस आर्थिक व्यवसायांत मागणी नाहीं अशा पदवीधरांचें काय होणार? जुन्या सवयींमुळें महाराष्ट्रीयांचे आचार-विचार झपाट्याच्या औद्योगिक प्रगतीस अनुकूल नव्हते आणि रोजच्या लिखाणें व भाषणें ह्यांवर बौद्धिक व पुस्तकी छाप अजूनहि राहिला आहे. महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगति होण्यास त्यांतील बुद्धिमान् लोकांनीं जुन्या चाकोरीच्याबाहेर जाणें आवश्यक होतें; पण तसें झालें नाहीं. स्वसंस्कृतिरक्षण आणि बौद्धिक व्यवसाय ह्या गोष्टी प्रत्येक समाजास अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि या बाबतींत महाराष्ट्रानें आपलें अग्रेसरत्व सोडलें नाहीं ही अभिमानाची गोष्ट आहे यांत शंका नाहीं. तथापि आर्थिक संपन्नता हें संस्कृतीचें महत्त्वाचें अंग आहे आणि संपत्तीचीं साधनें हातीं नसणें हें सामाजिक वैगुण्य आहे हें विसरतां कामा नये. जुन्या पद्धतींत वाढलेल्या लोकांच्या आचार-विचारांत बदल होणें कठिण असतें, पण बेकारीचा हिसका सोसावा लागत आहे तो तरुण पिढीस. ह्या कारणानें आर्थिक प्रश्नानें आज उग्र स्वरूप धारण केलें असून जुन्या पिढीतहि चिंता उत्पन्न केली आहे. पण ही स्थिति पालटण्याचीं चिन्हें अलीकडे दिसूं लागलीं आहेत ही गोष्ट उत्तेजनकारक आहे. धंदे व व्यापार यांचेवांचून तरणोपाय नाहीं ह्याच्या जाणिवेनें विधायक कृतीस प्रारंभ झाला आहे. (अपूर्ण)

"केसरी"च्या हीरकमहोत्सव विशेषांकांतील प्रो. वा. गो. काळे ह्यांचा लेख.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी, गेल्या वर्षांतील ८ लक्ष, ८ हजार रुपये शिलकी नफा धरून, एकूण ३८ लक्ष ५५½ हजार रुपये नफा झाला. जून, १९४० अखेरच्या सहामाहीचे ६% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड वाटले होते. आतां दुसऱ्या सहामाहीचे ८% करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत येणार आहे. म्हणजे, वर्षाचे ७% डिव्हिडंड पडले. भागीदारांस ह्याशिवाय २% बोनसहि देण्यांत यावयाचा आहे. नफ्यांतून वरीलप्रमाणें वाटणी करण्याचा डायरेक्टरबोर्डाचा विचार आहे.

### बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी, गेल्या वर्षांतील ८ लक्ष, ८६ हजार रुपये शिलकी नफा धरून, एकूण २८ लक्ष, ४५ हजार रुपये नफा झाला. जून, १९४० अखेरच्या सहामाहीचे ११% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड वाटलें होतें; आतां दुसऱ्या सहामाहीचे पुनः ११% करमाफ डिव्हिडंड वाटण्यांत येणार आहे. म्हणजे, सबंध वर्षाचें ११% डिव्हिडंड झालें. वरीलप्रमाणें वाटणी करण्याचा डायरेक्टरबोर्डाचा विचार आहे.

दि
बँक ऑफ महाराष्ट्र,
लिमिटेड
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना




मधुमेहावरील
औषध
तीन आठवड्यांचे
औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स
कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस
"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धीखातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबूत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.

## गेल्या वर्षाचें आर्थिक समालोचन

(१)

दरसाल प्रमाणें मुंबई येथील शेअर, स्टॉक व फिनॅन्स ब्रोकर्स मेसर्स आर. आर. नावर आणि कंपनी ह्यांनीं १९४० मधील घडामोडींचा आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. गेलें वर्ष हें अत्यंत आणीबाणीचें गेलें. हिंदुस्थानांत औद्योगिक चलती होईल व शेअर्सचे भाव चढतील, ही अपेक्षा फोल ठरली. सर्व देशांतील लष्करी खर्चांत वाढ झाली व त्यामुळें औद्योगिक उत्पादन वाढलें, तरी गेल्या वर्षी हिंदी परिस्थिति फारशी सुधारली नाहीं. सध्याची युद्धविषयक वार्ता आतांपर्यंतपेक्षा अतिशय समाधानकारक आहे. अमेरिकेचें ग्रेटब्रिटनला प्रभावी रीतीनें सहाय मिळूं लागलें आहे. ग्रेट ब्रिटनचा रोजचा युद्धखर्च ८½ कोटि रुपयांवरून २४ कोटि रुपयांवर गेला आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या युद्धप्रयत्नांस हिंदुस्थानाची सर्व प्रकारांनीं मदत व्हावी ह्या दृष्टीनें डिफेन्स ऑफ इंडिया नियमांखालीं आर्थिक व्यवहार नियंत्रित करण्यांत आले व त्यामुळें बाजारांत भरमसाट चलबिचल होण्यास प्रतिबंध झाला.

वर्षाचे प्रारंभींच कपाशीचे भाव घसरले व जादा नफ्यावरील कराचे घोषणेनें त्यास अधिक घसरगुंडी लागली. पुढें मे व जून मध्यें युरोपांतील प्रमुख देश जर्मनीच्या ताब्यांत गेले व सर्व मालाचे बाजारभाव एकदम खाली गेले. लवकरच ग्रेटब्रिटनच्या यशस्वी प्रतिकारानें बाजार सुधारले व विश्वासाचें वातावरण निर्माण झालें. ग्रेटब्रिटन व त्याचीं दोस्त राष्ट्रें ह्यांस मालाचा पुरवठा चालू रहावा ह्याकरितां हिंदुस्थान सरकारनें अगदीं प्रारंभींच हिंदुस्थानचा तटस्थ राष्ट्रांशीं चालणारा व्यापार नियंत्रित केला, परंतु वर्षाचे मध्याचे सुमारास सबंध मध्ययुरोपच शत्रुपक्षाचे हातीं गेला. माल वहातुकीस अडचण भासूं लागली व केप ऑफ गुड होपला वळसा घालण्याचा मार्ग आगबोटींस अवलंबावा लागला. त्याकारणानें निर्गत व्यापारांत थोडी घट झाली. हिंदुस्थानाचें सुमारें ३१ कोटि रुपयांच्या निर्गत व्यापाराचें नुकसान झालें असावें, असा अंदाज आहे. कपास, ताग, गळितांचीं धान्यें, इत्यादि पेरणाऱ्या शेतकऱ्यांस त्यामुळें विशेष झळ लागली. शेतीच्या मालाची निर्गत कमी झाली तरी तयार मालाची निर्गत पुष्कळच वाढली. परदेशांतून हिंदुस्थानांत माल येणें अवघड झालें व त्यांतच हिंदुस्थानाचें परराष्ट्रांकडूनचें येणें युद्ध प्रयत्नासाठीं कायम राखण्याचें व त्या क्रयसाधनाचा उपयोग नियंत्रित करण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें. आयात अर्थातच रोडावली. यंत्रसामुग्रीच्या आयातीच्या अडचणीमुळें हिंदी कारखानदारांस थोडा त्रास झाला; बाकी विशेष प्रतिकूल परिणाम झाला नाहीं. शक्य तितक्या आगबोटी हिंदुस्थानाचे संरक्षणासाठीं उपयोगांत आणण्यांत आल्या व वहातुकीचे दरहि वाढले, त्यामुळें अंतर्गत व्यापार कमी झाला.

पैशाचा पुरवठा स्वस्त व मुबलक राहिला. बँक रेट ३% कायम होता. बँकांच्या रिझर्व्ह बँकेकडे ८ डिसेंबर, १९३९ रोजीं १४¾ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या, त्या ६ डिसेंबर, १९४० रोजीं ४८¾ कोटींवर गेल्या व शेड्यूल्ड बँकांजवळील ठेवींची रकम २४६ कोटींची २७७ कोटि झाली. व्याजाचे दर चढूं न देण्याचें सरकारचें वाजवी धोरण आहे. रेल्वेचे दरांत वाढ, साखरेवरील एक्साइज पट्टींत वाढ, इन्कम टॅक्सवर सरचार्ज, जादा नफ्यावरील कर, इत्यादि दिशांनीं सरकारनें करांचें उत्पन्न वाढवलें.

## बाजारभावांतील चढउतार

सन १९४० मध्यें शेअर्स व कर्जरोखे ह्यांच्या किंमतींत चढउतार कसा झाला, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| | १९३९ असेर (२३-१२-३९) | १९४० सर्वांत अधिक | १९४० सर्वांत कमी | १९४० असेर (२०-१२-४०) | वाढ अगर घट |
|---|---|---|---|---|---|
| बॉंबे डाइंग | ११३०-१ | १२१२-८ | ८६०-० | १०४८-१२ | - ८१-४ |
| सेंचुरी | ४१३-८ | ४३४ | २५० | ३६७-८ | - ४६-० |
| कुलाबा | २१६-८ | २३० | १२५ | १६७-८ | - ४९-० |
| गोकाक | २३१-० | २५१-८ | १७० | २०९-८ | - २१-८ |
| कोहिनूर | ४५०-० | ४६६ | ३११ | ३८५-० | - ६५-० |
| न्यू ग्रेट | ४६२-० | ४९७-८ | ३१० | ३८४-० | - ७८-० |
| सिंप्लेक्स | १३५-८ | १४८ | ९० | १०१-० | - ३४-८ |
| स्वदेशी | ३४६-० | ३९३ | २१५ | १६४-० | - ८२-० |
| बॉंबे ट्रामवे | १३१-८ | १३४ | १२२ | १३१-० | - ०-८ |
| आंध्र व्हॅली | १९९०-० | १६५७-८ | १४३५ | १६३५-० | +१४५-० |
| टाटा हायड्रो | १५५-८ | १७८ | १४७ | १७५-० | + १९-८ |
| टाटा पॉवर | १३७६-४ | १५२७-८ | १२१५ | १५००-० | +१२३-१२ |
| टाटा स्टील ऑर्डि. | ४१५-८ | ४३६ | ३०५ | ३७१-० | - ४४-८ |
| टाटा स्टील डि. | २२१२-८ | २३९० | १६०० | १८९०-० | -३२२-८ |
| बेलापूर | २५८-० | २६५ | १६५ | २१८-० | - ४०-० |
| असोसिएटेड सिमेंट | १३८-८ | १४० | १०७-८ | १४०-० | + १-८ |
| इंपीरिअल बँक | १४९७-८ | १५८५-० | १४१२-८ | १५८५-० | + ८७-८ |
| रिझर्व्ह बँक | १०७-० | ११०-४ | ९७ | १०५-४ | - १-१२ |
| सेंट्रल बँक | ३३-१४ | ४०-६ | ३१ | ४०-६ | + ६-८ |
| न्यू इंडिया विमा | ३५-२ | ४०-४ | ३३ | ४०-० | + ४-१४ |
| ३½% रोखे | ८७-१० | ९५-७ | ८४-१२ | ९४-० | + ६-६ |
| ५% १९४५-५५ रोखे | ११०-६ | ११२-१० | १०४-० | ११२-६ | + २-० |
| ४% १९६०-९० रोखे | १०२-४ | १०९-० | ९८-१२ | १०७-८ | + ५-४ |


**डॉ. एन. आर. राजोपाध्ये**

**यांचे**

अॅशगोल or पौष्टिक पिल्स घ्या. किंमत १२ आ. फक्त

सोल एजंट: "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.

एजन्सी देणें आहे. एक आण्याचा स्टँप पाठवून विचारावें.



डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें

**"वेलणकर वनौषधालय"**

येथें सर्व तऱ्हेच्या वनस्पति व सिद्धौषधी मिळतात व १ पैशापासून सिद्ध औषधीपर्यंत मिळतात. हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें रोगी तपासून औषध देण्याचीही सोय आहे. व दम्यावर दर रविवारीं मोफत औषध दिलें जातें. उघडण्याची वेळ:–सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.

पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

## शेतकऱ्यांच्या कर्जफेडीच्या कायद्याखाली प्रसिद्ध केलेले कानू आणि त्यांसंबंधानें सूचना

### (२)

लेखक—विनायक गणेश तिखे

### कलेक्टरची यादी व सरकारचा अधिकार

कलेक्टरनें तयार केलेली यादी, सरकारकडे दाखल व्हावयाची आहे व अशी यादी दाखल झाल्यानंतर त्या यादींतील नांवें कमी करणें, अगर त्यांमध्यें अधिक नांवें दाखल करणें, याबद्दल प्रांतिक सरकारनें आपल्याकडे अधिकार ठेवला आहे, " (पहा, कानू नं. ६ पो. कानू नं. २)." या अधिकारामुळें कलेक्टरच्या यादीचा विचार सरकारकडून व्हावयाचा आहे.

### बोर्ड आणि बोर्डाकरिता संस्था

मूळ कायद्याचें कलम ४ पोट कलम २ ब, प्रमाणें एकाद्या संस्थेला बोर्ड म्हणून नेमतां येईल.

या संस्था कोणत्या असाव्यात, याचा विचार कानू नं. ५ पो. कानू नं. ३ यामध्यें केला आहे. खालील संस्था लायक ठरविल्या आहेत.

(१) सन १९१३ सालच्या कंपनी ॲक्ट खाली नोंदलेली संस्था, (२) सन १९१२ अगर १९२५ च्या सहकारी कायद्याखाली नोंदलेली संस्था, (३) सन १८६० च्या सोसायटीज ॲक्ट खाली नोंदलेली संस्था अशी मान्यता दिलेली आहे. यांत नवीन संस्था सुचविण्याचें कारण दिसत नाहीं, परंतु या संस्थांतील निवड कशी करावी या संबंधीं सुचविलें तर गैरवाजवी दिसणार नाहीं. ही सूचना अशीः—

८ सूचना—'कानू नं. ५ पो. कानू, नं. ३ च्या शेवटीं यापुढील मजकूर घालावा, " आणि ज्या क्षेत्राकरितां बोर्ड नेमावयाचें असेल त्या सर्व क्षेत्रामध्यें प्रत्यक्ष काम करीत असल्याशिवाय आणि शेतकऱ्यांच्या व्यवहाराशीं प्रत्यक्ष संबंध असल्याशिवाय नेमण्यांत येणार नाहीं." ही सूचना मंजूर झाली म्हणजे लगेच एकाद्या लहानसान संस्थेची अगर संबंध नसणाऱ्या संस्थेची नेमणूक होणार नाहीं. या सूचनेची व्यवहाराच्या दृष्टीनें विशेष जरूरी उत्पन्न होणार नाहीं, परंतु नियमाच्या दृष्टीनें जरूरी आहे.

### बोर्ड स्थापन झाल्याचें जाहीर करण्याची रीत

ही रीत कानू नं. ४ मध्यें दिली आहे. ती अशीः—सरकारी गॅझिटांत प्रसिद्ध होईल त्याची एक एक प्रत कलेक्टर, मामलेदार, महालकरी यांच्या कचेरींत, सबजज्ज कोर्टांत प्रसिद्ध केली जाईल, गांवची चावडी, अगर प्रमुख ठिकाण, येथें डकविली जाईल. गांवामध्यें ढोलीं वाजवून अगर सोयीस्कर अशा दुसऱ्या रीतीनें जाहीर केली जाईल. तसें त्या क्षेत्राशीं संबंध येणाऱ्या वर्तमानपत्रांत निदान चार वेळां बोर्ड स्थापन झाल्यापासून एक महिन्यांत कलेक्टर प्रसिद्ध करील.

अशी ही रीत आहे. या रीतीकडे पाहिल्यास आणखी कांहीं सूचना करण्याचें कारण नाहीं, मात्र या रीतीची अंमलबजावणी चांगल्या रीतीनें होते किंवा नाहीं त्याच्याकडे लोकांनीं लक्ष देणें जरूर आहे.

### बोर्डाच्या सभेचीं ठिकाणें

यासंबंधींचा नं. ८ चा कानू असा आहेः—प्रत्येक बोर्डाकरिता सरकारनें ठरविलेलें एक ऑफिस असेल, आणि त्या ठिकाणीं, बोर्डाच्या सर्वसाधारण सभा भरल्या जातील. संबंध येणाऱ्या पक्षकारास नोटीस देऊन आणि पहिल्या वर्गाच्या सबजज्जाची संमति घेऊन बोर्डाच्या अधिकारांतील कोणत्याहि ठिकाणीं बोर्डाला सभा भरवितां येतील, असा नियम आहे. आणि तो पुरेसा आहे. जर बोर्डाच्या या फिरतीच्या सभा पक्षकारास त्रासदायक वाटत असतील तर त्यास पहिले वर्गाच्या सब-जज्जाकडे अर्ज करतां आला पाहिजे, तशी सोय कानूमध्यें नाहीं, म्हणून त्यासाठीं पुढील सूचना दिली पाहिजे.

८ सूचना—कानू नं. ८ च्या शेवटीं पुढील मजकूर अधिक घालावा " मात्र ही संमति देतांना त्या बाबतींत कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्याचा विचार त्या पहिला वर्ग सब-जज्जानें करावा.

### बोर्डाच्या सभेचें कामकाज

प्रत्येक बोर्डाच्या सभेचें अध्यक्षस्थान चेअरमन स्वीकारतील आणि कामकाज चालवितील, असा कानू नं. ९ आहे. हा कानू मूळ कायद्याचें ४ पोट कलम ६ यांस थोडेसा विसंगत होणारा आहे. या कलमामध्यें, चेअरमनच्या अभावी व्हाईस चेअरमन काम चालवितील, चेअरमन आणि व्हाईसचेअरमन गैरहजर असतील तर सभासद आपल्यांतून चेअरमन निवडतील; ज्यावेळीं चेअरमन, व्हाईसचेअरमन वगैरे गैरहजर राहतील त्यावेळीं, त्या क्षेत्रांतील पहिला वर्ग सबजज्जानें चेअरमन निवडावयाचा आहे. कानू नं. ९ मध्यें प्रत्येक सभेचें काम चेअरमन चालवील असें म्हटले आहे. आणि कानू २ पोट कानू २ मध्यें चेअरमनची व्याख्या सरकारनें नेमलेला असा आहे, कानू २ पोट कानू २ मुळें बोर्डाच्या सभासदाचा चेअरमन निवडण्याचा हक्क नाहींसा होत आहे. तसेच पहिला वर्ग सबजज्जाचा हक्कही नाहीसा होत आहे. म्हणून हा कानू मूळ कायद्याच्या हेतूच्या विरुद्ध आहे. तेव्हां या कामीं पुढील सूचना आहे.

९ सूचना—कानू नं. ९ रद्द करावा, अगर कानू नं.१० च्या शेवटीं मूळ कायद्याचें कलम ४, पो. कलम ६ मधील, सर्व मजकूर घालावा.

किंवा कानू नं. २ पो. क. २ (I) यामध्यें दुरुस्ती करण्याकरितां पुढील सूचना करावी.

१० सूचना—कानू नं. २ पो. कानू नं. २ (II) च्या शेवटीं पुढील मजकूर घालावा "अगर कायद्याचे कलम ४ पो. क. ६ यास पात्र असून चेअरमन आणि व्हाइसचेअरमन असतील."

या सूचनेमुळें चेअरमन आणि व्हाइसचेअरमनच्या जागेचा प्रश्न उत्पन्न होणार नाहीं.

### बोर्डाच्या सभेच्या तारखा, वेळ व ठिकाण

कानू नं. १०—सभेच्या तारखा चेअरमन ठरवितील.

कानू नं. ११—बोर्डाच्या सभेची वेळ व ठिकाण हे संबंध येणारासच कळविलें जाईल.

यांत सूचना करण्याचें कारण नाहीं.

### एका माणसाच्या बोर्डाचे अधिकार कोणी चालवावयाचें

कानू नं. ७—या कानूंत विशेष रीतीनें सांगितलें असल्याशिवाय बाकीचे सर्व अधिकार व चालवितां येतील असे अधिकार हे ज्या इसमास बोर्ड म्हणून नेमलें असेल त्यानें चालवावयाचें आहेत.

यांतही सूचना करण्याचें कांहीं नाहीं.

### बोर्डाच्या दप्तराची भाषा

कानू नं. १३:—बोर्डाच्या दप्तराची भाषाही इंग्रजी अगर पहिला वर्ग सबजज्जाच्या कोर्टाची जी भाषा असेल ती, अशी असेल.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. वा. चिं. भानु, पुणें )

सहकारी दूध पुरवठा:—कलकत्ता येथें दुधाचा पुरवठा सहकारी तत्वावर करणाऱ्या सोसायट्यांचा एक संघ १९३९ सालापासून अस्तित्वांत आलेला आहे. हा संघ आपल्या सभासद सोसायट्यांचे व्यक्तिशः सभासदांच्या गरजा भागविणेस भांडवल पुरवितो व त्यांचे दूध किंवा त्यापासून होणारे पदार्थ म्हणजे क्रीम, लोणी, खवा, इत्यादींना गिऱ्हाईक पाहून देतो. या संघांत १२३ सोसायट्या सामील झालेल्या असून त्यांचे व्यक्तिशः सभासद सुमारें ८,००० आहेत. या सोसायट्या कलकत्त्यापासून १२ ते ४८ मैलांच्या टापूंत आहेत. हा संघ दररोज सामान्यतः १०५ मण दुधाची उलाढाल करितो. संघाकडे येणाऱ्या दुधाची शास्त्रीयरीत्या तपासणी करण्यांत येऊन त्यांतील चरबीचे प्रमाणावर प्रतवारी लावण्यांत येतें. तसेंच यांत्रिक साधनांनीं तें जंतुरहित करून बाटल्यांतून किंवा डब्यांतून भरण्यांत आल्यानंतर गिऱ्हाइकांना देण्यांत येते. मोठाले दवाखाने, बालसंगोपनगृहें, हॉटिल्स व व्यक्तिशः गिऱ्हाइकांनीं आपले रतीब या संघाकडे लावलेले आहेत. त्यामुळें दररोज दुधाचा खप सहजी होतो. या संघानें ५१,००० रुपये खर्चून एक स्वतःच्या मालकीची भव्य इमारत बांधली असून दुधाच्या यांत्रिक व शास्त्रीय तपासणीस लागणारी साधनसामुग्री सज्ज ठेवलेली आहे. कलकत्ता कार्पोरेशननें ( म्युनिसिपालिटीनें ) या संघास प्रथम रु. ५०,००० चें भांडवल बिनव्याजी दिलें होतें. शिवाय सरकारी शेतकी आणि सहकारी खात्यांतील तज्ज्ञ अंमलदारांचा सल्ला व मदत या संघास लागेल तेव्हां सहज मिळूं शकते. कारण त्या सरकारी खात्यांतीलच कांहीं अंमलदार संघांत कार्यवाहांचें काम करीत असतात.

* * *

लखनौ मध्येंही गेल्या २–३ वर्षांपासून असाच एक संघ दूध पुरवठ्याचें काम करीत आहे. कलकत्ता शहरांत दररोज सामान्यतः ३,००० मण दूध खपतें त्यापैकी संघामार्फत फक्त १०५ मण खपतें; तर लखनौमध्यें दररोज ३०० मण दूध खपतें. त्यांपैकी तेथील संघ ४० मणाचा पुरवठा करितो. यावरून लखनौ संघाच्या कारभाराची तुलनात्मक कल्पना येईल. कलकत्ता संघाला दवाखाने, हॉटेलें व बालसंगोपनगृहें अशीं घाऊक बांधील गिऱ्हाइकें लाभलीं आहेत, तशी अद्याप लखनौ संघाला मिळालेलीं नाहींत. १०५ मणांपैकी ७० मण दूध हीं च गिऱ्हाइकें घेतात ! कलकत्याकडील सोसायट्या पगारी नोकरांकडून दूध काढून घेतात, तर लखनौमध्यें स्वतः सभासदच हें काम करितो व त्यावर पंचकमिटीची देखरेख असते. नियोजित केंद्रस्थानीं दुभतीं जनावरें जमवून तेथें दूध काढण्यांत येतें. त्यामुळें स्वच्छता, आरोग्य इत्यादि बाबींकडे सहज लक्ष पुरविलें जातें. पण कलकत्त्याप्रमाणें यांत्रिक साधनें लखनौ संघाला अद्याप उपलब्ध झालेलीं नाहींत. लखनौ म्युनिसिपालटीनें सहानुभूति दाखविल्यास तेंही शक्य होईलच.

* * *

मद्रास इलाख्यांत दुधाचा पुरवठा करणाऱ्या ५१ सोसायट्या असून त्यांचे ६ संघ आहेत. या सोसायट्यांत १६१३ सभासद आहेत. सभासदांचेकडून दूध गोळा करून तें संघाकडे पाठविणें हें सोसायट्यांचें प्रमुख काम. याप्रमाणें जमणाऱ्या दुधाची विक्री करणें हें संघाचें काम समजलें जातें. खुद्द मद्रास शहरांतील संघानें १९३८–३९ सालांत रु. २,०५,००० चें दूध खरेदी केलें व तें रु. २,४०,००० ला विकलें. सर्व खर्चवेंच वजा जातां यूनियनला रु. १३,९१५ चा निवळ फायदा झाला.

* * *

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११२—८ |
| ४% १९४३ | १०४—९ |
| ३½% विनमुदत | ९४—३ |
| ३½% १९४७–५० | १०२—२ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९३—४ |
| २¾% १९४८–५२ | ९६—५ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०६–१२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११३—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १३८—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४०–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५७३–१२ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०६—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१३—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ७१३–१२ |

#### इतर


| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २१७—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४६—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २०—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ४०—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३८००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २११—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३७०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | १८७०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३९–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–१–३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–२–० |

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खन्याखुन्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

**फुकट**—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॅाचेस फुकट बाक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बाक्षिस आणि टपाल हंशील माफ.

**पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी**
**पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)**

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

## वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

**Prop. M. V. Risbud, B. A.**
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल आवळ्याचे तेल
स्थापना १९०६
डोकें शांत रहातें, केंस मजबूत होतात,
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग क. (मुंबई नं. ४)



तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अति स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.